दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788


■ वाशीम ■ रविवार, ०५ एप्रिल २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३५४ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# एलपीजी टँकर 'ग्रीन सान्वी' मुंबईकडे मार्गस्थ

## होर्मुझ सामुद्रधुनी पार करणारे सातवे भारतीय जहाज

महाराष्ट्र जीत

मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक जहाजवाहतुकीवर परिणाम होत असतानाच भारतासाठी दिलासा देणारी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. भारताकडे येणाऱ्या एलपीजी टँकर 'ग्रीन सान्वी'ने रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीरित्या पार केली असून, हे जहाज सध्या मुंबईकडे मार्गस्थ आहे.





मरीन ट्रॅफिकच्या लाईव्ह ट्रॅकिंगनुसार, भारतीय ध्वज असलेले हे जहाज सुमारे ४६,००० मेट्रिक टन द्रवरूप पेट्रोलियम वायू (एलपीजी) घेऊन येत आहे. 'मित्सुई ओ.एस. के. लाईन्स' या कंपनीच्या मालकीचे हे जहाज आहे.

**तणावातही सातवे भारतीय जहाज पार**

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे समुद्री वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात निर्बंध आले असताना 'ग्रीन सान्वी' हे होर्मुझ सामुद्रधुनी पार करणारे सातवे भारतीय ध्वजधारी व्यापारी जहाज ठरले आहे. विशेष म्हणजे, ही सर्व सातही जहाजे एलपीजी टँकर्स आहेत.

**पर्शियन गल्फमध्ये अजूनही १७ भारतीय जहाजे सक्रिय**

उपलब्ध शिपिंग डेटानुसार, होर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील पर्शियन गल्फ परिसरात सध्या किमान १७ भारतीय ध्वजधारी जहाजे कार्यरत आहेत. यामध्ये एलपीजी वाहक, कच्च्या तेलाचे टँकर्स, एलएनजी टँकर, केमिकल टँकर, कंटेनर जहाजे, बल्क कॅरियर्स तसेच देखभालीसाठी थांबवलेली जहाजे यांचा समावेश आहे.

याशिवाय 'ग्रीन आशा' आणि 'जॅग विक्रम' ही आणखी दोन भारताकडे येणारी एलपीजी टँकर्स येत्या काही दिवसांत होर्मुझ सामुद्रधुनी पार करण्याची अपेक्षा असून, त्यामुळे इंधन पुरवठ्यावरील चिंता आणखी कमी होण्याची शक्यता आहे.

**भारतासाठी एलपीजी पुरवठा महत्त्वाचा**

मध्य पूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे. भारत मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या एलपीजीवर अवलंबून असल्याने या परिस्थितीचा देशावर विशेष परिणाम होत आहे. याच पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने इराणसोबत राजनैतिक स्तरावर सक्रिय संवाद वाढवला आहे, जेणेकरून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध होऊ शकेल.

**इराणची स्पष्ट भूमिका**

इराणने नुकतेच स्पष्ट केले आहे की, भारतासह जे देश शत्रुत्वाच्या भूमिकेत नाहीत, त्यांच्या जहाजांना समन्वयाने होर्मुझ सामुद्रधुनीतून मार्ग दिला जाईल. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनीही भारत, चीन, रशिया, इराक आणि पाकिस्तानसारख्या मैत्रीपूर्ण देशांसाठी ही जलवाहतूक मार्गिका सुरूच राहणार असल्याचे सांगितले आहे.

# गाव विक्रीस काढत आंदोलन तीव्र; कृषिमंत्र्यांचा पुतळा जाळून संताप व्यक्त

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ आडोळी येथील ग्रामस्थांनी आंदोलन तीव्र केले असून, 'सातबारा कोरा करा' या प्रमुख मागणीसाठी गावच विक्रीस काढण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला आहे. आंदोलनाचा आज तिसरा दिवस असून, ग्रामस्थांचा संताप दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्ता मामा भरणे यांनी आंदोलनाची दखल घेतली नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून तीव्र निषेध नोंदवला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. गेल्या काही वर्षांपासून नापिकी, अवकाळी पाऊस, वाढता कर्जबोजा आणि अपुऱ्या पीकविमा यामुळे आडोळीतील शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. वारंवार शासनाकडे मागण्या करूनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर ग्रामस्थांनी संपूर्ण गाव विक्रीस काढण्याचा निर्णय घेतला. गावाच्या प्रवेशद्वारावर 'गाव विक्रीस आहे' असे फलक लावून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी ग्रामस्थांनी



जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला.

'शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारचा निषेध असो', 'कर्जमाफी द्या, अन्यथा आंदोलन तीव्र करू' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून, प्रशासनावरही दबाव वाढताना दिसत आहे. मात्र, अद्याप शासनाकडून कोणतीही ठोस भूमिका समोर आलेली नाही.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज विना अट माफ करावे, सर्व शेतकऱ्यांना सरसगट पीक विमा लागू करावा, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ भरपाई द्यावी, सातबारा कोरा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. आगामी काळात रास्ता रोको व ठिय्या आंदोलनाची शक्यता वर्तवली जात आहे.

# निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी प्रकाशित

महाराष्ट्र जीत

**श्रीरामपूर(प्रतिनिधी -गुरुनाथ तिरपणकर)** : श्रीरामपूर येथील सुप्रसिध्द चित्रपट गीतकार निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी पुणे येथील जागतिक किर्ती चे प्रकाशन दिलीपराज प्रकाशन यांनी प्रकाशित केली आहे. महाराष्ट्रातील लोककलेची झालेली वाताहत या कादंबरीत अतिशय कलात्मक पद्धतीने चित्रीत करण्यात आलेली आहे. तमाशा ही लोककला लयाला जाऊन तिचा ऑर्केस्ट्रा झाला.जागरण गोंधळ लोककलेचा तमाशा झाला. महाराष्ट्राची शान असलेल्या लावणीचा डान्सबार झाला. अंगप्रदर्शन करीत डी जे च्या गोंगाटात अश्लील इशारे करीत पाटील आडनावे धारण करुन अनेक स्वयंघोषित लावणी सम्राज्ञी यांनी लोककलेचा बाजार मांडला.कलाकेंद्राच्या नावाखाली डान्सबार सुरू झाले.शहरातील काळे डांबरी रस्ते खेड्यात आले.ईथल्या पवित्र पायवाटां रोलरने खडी डांबराखाली गाडल्या गेल्या.तरुणपिढी वैफल्यग्रस्त झाली या सर्वांचे वास्तव चित्रण असलेली खास नगरी बोलीभाषेतील कादंबरी अतिशय कलात्मक स्वरुपात वाचकांच्या हातात आली आहे.



निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांनी अनेक मराठी चित्रपटात गीतलेखन केलेले असुन चित्ररंग या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्र भर कलाभ्रमंती केलेली आहे.त्यांच्या अनेक कविता आणि चित्रपट गीतांचा वेगवेगळ्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे.या समृद्ध अनुभवातुन या कादंबरी चे अतिशय तरल लेखन त्यांनी केलेले आहे.या कादंबरीला जेष्ठ पत्रकार विवेक सबनिस यांची दिर्घ प्रस्तावना लाभलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव यांचे कलात्मक चित्र लाभलेले आहे.वेगवेगळ्या चित्रपट निर्मिती संस्था यांनी या सत्य घटनेवर आधारित कथानकावर चित्रपट निर्मिती साठी मागणी केलेली आहे. लोकसाहित्याचा अभ्यास असलेल्या नामवंत दिग्दर्शक यांना मी चित्रपट निर्मिती चे अधीकार देणार असल्याची प्रतिक्रिया कवीवर्य बाबासाहेब सौदागर यांनी आमच्या प्रतिनिधीना दिलीआहे.

# भिवंडी शहरातील नागरिकांनी मतदारयादीतील 'मॅपिंग' प्रक्रियेत सहभागी व्हावे - आयुक्त अनमोल सागर यांचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या 'विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची' (SIR) पूर्वतयारी सध्या सुरू आहे. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील मतदारांचे 'सन २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग' करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, भिवंडी १३६ - भिवंडी ( पश्चिम ) विधानसभा मतदारसंघ व १३७ - भिवंडी ( पूर्व ) विधानसभा अंतर्गत महानगर पालिका क्षेत्रात समाविष्ट नागरिकांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका आयुक्त अनमोल सागर (भाप्रसे ) यांनी केले आहे.

मॅपिंग प्रक्रिया नेमकी काय आहे?

सन २००२ मध्ये शेवटचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम झाला होता. आता पुन्हा तीच प्रक्रिया राबवली जाणार असल्याने, सध्याच्या मतदार यादीतील नावांची जुन्या (२००२ च्या) नोंदींशी सांगड घातली जात आहे. हे मॅपिंग दोन प्रकारे करता येईल:

१. Person to Person Mapping: ज्या मतदारांचे नाव २००२ च्या यादीत आधीपासूनच होते, त्यांनी थेट स्वतःच्या नावाचे मॅपिंग करावे.

२. Progeny Mapping: ज्या तरुण मतदारांची नावे २००२ मध्ये नव्हती, त्यांनी आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या २००२ मधील नावाचा आधार घेऊन आपले नाव लिंक (Mapping) करावे.

तुमचा २००२ चा तपशील कसा शोधाल?*

मॅपिंगसाठी मतदारांना त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचा २००२ मधील यादीभाग क्रमांक (Part No.) आणि अनुक्रमांक (Sr. No.) आवश्यक आहे. हा तपशील मिळवण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:

भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या अधिकृत पोर्टलला भेट द्यावी. तेथे उपलब्ध असलेल्या २००२ च्या मतदार यादीच्या PDF फाईल्समधून आपल्या कुटुंबाचा जुना तपशील शोधावा.

नागरिकांनी काय करावे?

१. ऑनलाईन पोर्टलवरून स्वतःचा किंवा पूर्वजांचा २००२ मधील तपशील मिळवावा.

२. हा तपशील घेऊन आपल्या क्षेत्रातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांची भेट घ्यावी.

३. याशिवाय, अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी प्रभाग समिती क्र . १ ते ५, किंवा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय (उपविभागिय अधिकारी कार्यालय व तहसीलदार कार्यालय ) यांचेशी संपर्क साधून आपले आणि आपल्या कुटुंबाचे मॅपिंग पूर्ण झाल्याची खात्री करावी.

"मतदार यादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी हे मॅपिंग अत्यंत महत्त्वाचे आहे. महानगर पालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी आपल्या संबंधित 'बीएलओ'शी संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे, असे ही आवाहन आयुक्त अनमोल सागर यांनी यांनी केले आहे.

# रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायकांचे काम बंद आंदोलन

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक :** केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने गाव हितासाठी व शेतकरी शेतमजुरांच्या सर्वांगीण विकासासाठी चालत आलेली योजना म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आता या योजनेचे केंद्र सरकारने व्ही जी रामजी अर्थात विकसित भारत जी रामजी असे नामकरण करून याच कायद्याचे नामकरण केले या कायद्याचे नामकरण तर झाले, परंतु केंद्र आणि राज्य सरकारकडून ग्रामरोजगार सहायक मात्र उपाशीच असल्याचे रिसोड तालुका अध्यक्ष गजाननराव बाजड यांनी प्रस्तुत प्रदेश बोलताना म्हटले आहे, केंद्र शासन आणि राज्य सरकार या योजनेसाठी ग्रामविकास आणि शेतकरी विकासासाठी अनुक्रमे 60 टक्के 40 टक्के निधी देणार आहे ,परंतु महाराष्ट्र शासनाने 3 ऑक्टोबर 2024 रोजी ग्राम रोजगार सहायकांना आठ हजार रुपये मानधन व दोन हजार रुपये प्रवास भत्ता देण्याचा शासन निर्णय जाहीर केलेला आहे, त्या शासन निर्णयाची



गेल्या 18 महिन्यापासून अद्यापही अंमलबजावणी झाली नाही. म्हणजे गेल्या 18 महिन्यांपासून ग्राम रोजगार सहायकांना मानधन मिळालं नाही .या मानधनापासून ते वंचित आहेत महाराष्ट्र शासनाने ग्रामरोजगार सहायकांना वर उपासमारीची पाळी आणली आहे, प्रत्येक गोष्टीचा अंत असतो आता ग्राम रोजगार सहायक किती दिवस उपाशीपोटी शेतकऱ्यांना लाखो रुपयांची कामे करून देणार अर्थात जनता तुपाशी तर ग्राम रोजगार सेवक उपाशी असे म्हणण्याची वेळ आता आली आहे ग्राम रोजगार सायकांना दरमहा आठ ते दहा हजार रुपये मानधन देऊन शासनाने त्यांच्या व्यथा समजून घ्याव्यात शिवाय 30 मार्च 2026 रोजी केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार आयुक्त नागपूर यांनी दोन वेळा मजुरांची ऑनलाईन हजेरी घेण्याचा परिपत्रक जाहीर केला आहे, या परिपत्रकामुळे पूर्वी अर्धवेळ काम करणारा ग्राम रोजगार सहायकांना आता पूर्ण वेळ काम करावे लागणार आहे. पूर्ण वेळ काम करण्याचे शासनाने लादले असून सदर ग्राम रोजगार सहायकाला दर्जा अर्धवेळचा आणि काम पूर्ण वेळ असे का? हाही भेदभाव कोणत्याच कर्मचाऱ्यांना नसून रोजगार सेवकांनाच का आहे, याचा शासनाने विचार करावा या मागण्यासाठी महाराष्ट्रभर ग्राम रोजगार काम बंद आंदोलन करीत आहेत रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायक यांनी या काम बंद आंदोलनामध्ये सहभागी असून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करावी आणि अर्धवेळच्या ऐवजी ग्रामरोजगार सहायकांना दोन वेळेस हजेरी घ्यायची म्हटल्यास पूर्ण वेळच्या दर्जा द्यावा आणि त्या पूर्ण वेळच्या दर्जा नुसार मानधन वितरित करावे या मागणीसाठी रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायक आपल्या आंदोलनावर ठाम आहे तशा प्रकारचे निवेदनही रिसोड तालुका रिसोड गटविकास अधिकारी यांना दिलेले आहे. एकूणच शासन सिंचन विहीर, फळबागा ,गोठे ,घरकुल इत्यादी कामाचा व्याप ग्रामरोजगार सहायकांवर लादत असून त्यांना मात्र सतरा अठरा महिन्यापासून एक रुपयाची मानधन मिळाले नाही त्यामुळे काम कसे करणार व आपले घर कसे चालणार अशा प्रश्न निर्माण झाला आहे गजाननराव बाजड तालुका अध्यक्ष ग्राम रोजगार सहायक संघटना रिसोड

# बुलडाणा रिपाई आठवलेंच्या वतीने आंबेडकरी चळवळीचे पॅंथर बाळकृष्ण दादा इंगळे यांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**बुलडाणा,(प्रतिनिधी) :** बुलढाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाच्या वतीने आंबेडकरी चळवळीचे पॅंथर, आंबेडकरी चळवळीसाठी संपूर्ण आयुष्य घालवले व घालवीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या नामांतर आंदोलनात आग्रेसर असलेले, विद्यार्थी चळवळीपासून गोरगरीब, होतकरू, निराश्रीतांना नेहमीच मोबाईलच्या सेवेप्रमाणे तत्पर जिथे कोणी नाही तेथे तनमनधनाने उभे राहून मदतीचा हात देणारे रिपाईचे राष्ट्रीयध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार लोकनेते डॉ. रामदासजी आठवले साहेबांचे एकनिष्ठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)चे रिपाइं जिल्हाध्यक्ष आमचे स्नेही बाळकृष्ण दादा इंगळे यांच्या निवासस्थानी बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाचे जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून



त्यांच्या कार्याचा गौरव केला केला.त्यांच्या कार्याची नोंद घेतली पाहिजे हा उद्देश समोर ठेऊन त्यांना शाल गुच्छ देऊन सत्कार केला सामाजिक,राजकीय,धार्मिक विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.

त्यांच्या भावी कार्यास व पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा प्रसिद्ध प्रमुख वैभव दादा शिरसाठ व रिपाई बुलडाणा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय

### महासत्तेची दुखरी बाजू!

मानवी श्रमाला किंवा भावभावनांना पैशाच्या तराजूत तोलणाऱ्या आणि दिखाऊ-बाजारू व्यवस्थेला विकास समजणाऱ्या व्यवस्थेचे आपण वाहक बनलो आहोत. आपल्या भारतीय समाजाची अवस्थासुद्धा पत्ता हरवलेल्या अमेरिकेसारखी व्हायला फार काळ लागणार नाही.

बंगळुरू येथील उच्चशिक्षित सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुणाने अमेरिकेच्या आयटी कंपनीतील नोकरी गेल्यामुळे आत्महत्या केली. सकाळी ६ वाजता आलेल्या एका साध्या ई-मेलने प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून काढून टाकण्यात आले. पण तो एकटाच नव्हता, तब्बल १२,००० भारतीय कर्मचाऱ्यांना एकाच दिवशी, एकाच प्रकारे कामावरून कमी करण्यात आले. ही घटना ज्या कंपनीत घडली, तिला नुकताच ५१,००० कोटींचा विक्रमी नफा झाला होता. म्हणजेच, ही कपात आर्थिक अडचणीमुळे किंवा युद्धामुळे नव्हे, तर उपयोगितेच्या बदललेल्या प्राधान्यक्रमांमुळे करण्यात आली होती, हे स्पष्टच आहे.

ज्यावेळी मानवी श्रमाची गरज कमी कमी होत जाऊन त्याची जागा मशीन घेते, तेव्हा काम करण्याची पद्धत बदलून जाते. १९९० च्या जागतिकीकरण-खासगीकरणाच्या धोरणानंतर आपल्या देशात आलेल्या संगणकीय तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणात तरुण परदेशात जाऊन विविध सॉफ्टवेअर देशी-परदेशी कंपन्यांमध्ये नोकऱ्या करू लागले. त्यावेळी आलेल्या संगणकीय प्रणालीचा परिणाम सरकारी कर्मचाऱ्यांवर झाला, तर आता आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये प्रचंड खळबळ माजली आणि हजारो लोकांना आपली रोजगाराची साधने बदलावी लागली किंवा नोकऱ्या सोडाव्या लागल्या.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत मानवी मूल्यांची जपणूक होत नसेल, तर हा विकास कोणासाठी? असा प्रश्न निर्माण होतो. अमेरिकेसारख्या देशांमध्ये आज प्रचंड बेरोजगारी आहे. आपणही अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकत त्याच दिशेने जात आहोत. अशावेळी अमेरिकेच्या अंतर्गत समाजामध्ये अस्थैर्याच्या टोकदार जाणिवा किती भयानक आहेत, हे पु. ल. देशपांडे यांच्या लेखातून कळून येतं. ‘जिथे जीवन म्हणजे काहीतरी विकून श्रीमंत होण्याची संधी एवढाच अर्थ होतो, तिथे मढी पुरायची जागा विकली काय किंवा पिढीच्या पिढी गारद करणारी एलएसडी - गांजा-अफू विकली काय, सारे काही संस्कृतीला साजेसेच आहे. शस्त्रास्त्रांची विक्री थांबेल म्हणून ज्यांचे सोयरसुतक नाही, अशा देशांत जाऊन बॉम्बचा वर्षाव करायचा! काय विकतो आणि त्या विक्रीच्या वस्तूंचे काय परिणाम होतील, याचा विचार न करता विकत राहायचे. त्यांच्या बाजारपेठा शोधायच्या, त्या विक्रीसाठी जाहिरातीच्या नव्या नव्या क्लृप्त्या काढायच्या, त्यात मग विकणाऱ्या-विकणाऱ्यांची भयानक चढाओढ! बाजारात येणारा दुसऱ्याचा माल हुसकता हुसकता तो माल विकणाऱ्यालाच कसे हुसकता येईल, याच्या योजना आखायच्या. गिऱ्हाईकाची हे बरे की ते बरे? याचा विचार करण्याची विचारशक्तीच नष्ट करायची. हे सारे करताना कसलाही विधिनिषेध बाळगायचा नाही. वरील उतारा १९७४ साली प्रकाशित पु. ल. देशपांडे यांच्या ‘जावे त्यांच्या देशा’ या पुस्तकातील आहे. आज अचानक या लेखाची प्रकर्षाने आठवण येत आहे. ‘जावे त्यांच्या देशा’ हे पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले प्रवास वर्णन. व्हेनिस, रोम, इटली, सॅनफ्रान्सिस्को, हंगेरी आणि अमेरिका या देशातील प्रवासातील अनुभव आणि निरीक्षणे या पुस्तकात पु. ल. देशपांडे यांनी नोंदवली आहेत. त्यापैकी ‘एक बेपत्ता देश’ हा अमेरिकावर आधारित आहे. सत्तरच्या दशकातील अमेरिका आणि आजचा अमेरिका यांच्या मानसिकतेमध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही, परंतु १९७० चा भारत आणि आजचा भारत यामध्ये मात्र प्रचंड अंतर पडलेले दिसते.

या लेखात अमेरिकेत असणारी अस्थिरता आणि असुरक्षितता प्रकर्षाने जाणवते. त्याचे वर्णन करताना पु. ल. देशपांडे लिहितात, ‘किती संपन्न देश! प्रचंड वस्तुभांडारे! नजर ठरत नाही अशा एकेक वास्तू. पण प्रत्येक मजल्यावर

# ओटीपीशिवाय गॅस नाही! महागांवात उपासमारीचा धोका”

## जाचक अटींमुळे जीवन ठप्प; मूलभूत हक्कांवर गदा – नागरिकांचा संताप उफाळला

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव :** “ओटीपी नाही तर गॅस नाही” या कठोर नियमामुळे महागांव तालुक्यातील एलपीजी ग्राहकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः ठप्प झाले आहे. एचपी गॅस सिलेंडर रिफिलसाठी अनिवार्य करण्यात आलेल्या ओटीपी प्रणालीमुळे ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून, अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागातील मोबाईल नेटवर्कचा अभाव, साधे मोबाईल फोन, ओटीपी न मिळणे किंवा उशिरा मिळणे अशा अडचणींमुळे ही डिजिटल प्रणाली नागरिकांसाठी संकट ठरत आहे. गॅस एजन्सीकडून




“ओटीपी दाखवा, मगच सिलेंडर घ्या” असा अट्टाहास केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

यातच भर म्हणून महागांव येथील गॅस एजन्सीकडून रिफिल बुकिंग किमान १५ दिवस आधीच करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या दुहेरी जाचक अटींमुळे अनेकांना वेळेवर गॅस सिलेंडर मिळत नसून, स्वयंपाकाची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपैकी ‘अन्न’ ही सर्वात महत्त्वाची गरज आहे. मात्र गॅसअभावी स्वयंपाकच होऊ शकत नसल्याने हा प्रश्न केवळ तांत्रिक न राहता थेट नागरिकांच्या जगण्याच्या मूलभूत हक्कावर गदा ठरत आहे. जाचक अटी-शर्ती लादून नागरिकांना जीवनावश्यक सेवांपासून वंचित ठेवणे हे स्पष्टपणे संविधानिक अधिकारांचे उल्लंघन असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

प्रशासन व गॅस एजन्सींच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून,“सुविधा देण्याच्या नावाखाली अडचणी का वाढवल्या जात आहेत?” असा थेट सवाल जनतेकडून केला जात आहे. ‘डिजिटल इंडिया’च्या घोषणांमध्ये ग्रामीण वास्तव पूर्णपणे दुर्लक्षित झाल्याची टीकाही होत आहे.

नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित गॅस एजन्सी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महागांव तालुक्यातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून,“गॅस शिवाय जगायचं कसं?” हा प्रश्न प्रत्येक घरात ऐकू येत आहे.परिस्थिती अशीच राहिली, तर ‘फूड लॉकडाऊन’सारखी भीषण वेळ ओढवू शकते, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# सौ आशाताई लोखंडे यांना जिल्हास्तरीय रणरागिनी स्त्री गौरव पुरस्कार जाहीर

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** संविधान बहुउद्देशीय कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या महासचिव सौ आशाताई लोखंडे यांना सामाजिक क्षेत्रात काम करत असताना वंचित शोषित व पीडित घटकांसाठी अहोरात्र काम करत असतात कामगार दिव्यांग निराधार तसेच सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात अनेक सामाजिक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असून सामाजिक न्याय समता बंधुता मूल्याची जपणूक आपल्या कार्यातून केली आहे यात्यांच्या



समाज उपयोगी कार्याची दखल घेत ग्राहक ( उपभोक्ता ) संरक्षण समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष माननीय दादाभाऊ केदारे सर यांच्या वतीने जागतिक महिला दिन व जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून भव्य ग्राहक महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे याप्रसंगी सौ आशा लोखंडे महासचिव यांना जिल्हास्तरीय रणरागिनी स्त्री गौरव पुरस्कार 2026 जाहीर करण्यात आला आहे ठिकाण भगवती लॉन्स जुना सायखेडा रोड पंचक जेलरोड नाशिक रोड नाशिक या ठिकाणी दिनांक शनिवार 18/ 4/ 2026 रोजी सकाळी दहा वाजता संपन्न होणार आहे ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त सामाजिक क्षेत्रातील सर्व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वार्ड क्रमांक 1 कडे जाणून–बुजून प्रशासनाचे दुर्लक्ष रस्त्याचे काम सुरू न केल्यास छावा संघटना करणार तीव्र आंदोलन

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** देवळाली कॅम्प येथे काही महिन्या पासून सर्व वॉर्डात सिमेंट कॉंक्रेट रस्त्याचे काम सुरु झाले होते आणि पूर्ण पणे काम झालेले आहे, जिथे सिमिट कॉंक्रेट रस्त्याची गरज नसल्याने तरी पण त्या ठिकाणी काम झालेले आहे पण देवळाली कॅम्प वॉर्ड क्र १ डेव्हलोपमेंट एरिया पंचशील नगर येथे सर्व मागासवर्गीय वॉर्ड आणि सर्व जाती धर्माचे लोक असल्या मुळे सिमिट कॉंक्रेट रोडची अवस्था खुप बिकट झाल्या मुळे तिथले रहिवासांना खुप त्रास सहन करावा लागतं आहे वारंवार निवेदन देऊनहि प्रशासनाचे



व खासदार आमदार यांचे काही लक्ष नाही सण 2024 पासून वारंवार निवेदन देऊनहि प्रशासन जागे झालेले नाही तरी लवकरात लवकर वॉर्ड क्र १ मधील डोलोपमेंट एरिया धिवरे बंगला येथील सिमिट कॉंक्रेटचे १२४ मिटरचे तसेच गेल्या ३५ वर्षा पासून जे गटरीचे चेंबर बांण्यात आले होते ते पण नवीन दराने बांधावे जेणेकरुण गटारी मध्ये जे घाण कचरा असेल ते साफ होऊन



आणि चेंबर मधले पाईप लाईन किलिअर होईल तरी हे त्वरित काम सुरु करावे हि विनंती करण्यात आली आहे असं ना झाल्यास छावा स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल याची जबाबदारी प्रशासनावर राहील असे छावा मराठा मुस्लिम आघाडी प्रदेश अध्यक्ष राशिद भाई सैय्यद यांनी केले आहे

# “नरेंदर कब मिलेगा सिलेंडर” ; राज्यव्यापी आंदोलन मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे केले आव्हान - जिल्हा अध्यक्ष चेतन भाऊ गांगुर्डे

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने6 एप्रिल 2026 रोजी नाशिक कलेक्टर ऑफिस येथे सकाळी 11 वाजता.“नरेंदर कब मिलेगा सिलेंडर आंदोलननाशिक जिल्हाध्यक्षमा. चेतन दादा गांगुर्डे

नाशिकमहानगर अध्यक्षदिनेश दादा जाधवमहिला जिल्हा अध्यक्षउर्मिला ताई गायकवाडयुवा जिल्हा अध्यक्ष दामोदर पगारे युवा महानगर अध्यक्ष दीपक पगारेसम्यक जिल्हा अध्यक्ष मिहीर गजबे यांच्यानेतृत्वाखाली करण्यात येणार आहे,तरीसर्वजिल्हाकार्यकारणी,शहर कार्यकारणी,तालुका कार्यकारणी सदस्य व पक्षाचे कार्यकर्ते, हितचिंतक यांनी तसेच भारतीय बौद्ध महासभा सम्यक विद्यार्थी आंदोलन वंचित बहुजन आघाडीच्यासर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या सहकार्यासोबत आंदोलनात सहभागी व्हावे.देशभरात गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुजरा मोदीच्या देश विकण्याच्या आर्थिक नितीमुळे




देशात गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा झाला आहे.

महिला, गृहिणी, मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅससाठी तासन्तास लांब रांगेत उभे राहावे लागत आहे, तरीही गॅस मिळत नाही. गॅस सिलेंडरची काळाबाजार




सुरू आहे. याचा भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी मोठ्या संख्येने आंदोलनात सामील व्हा असे आव्हान जिल्हाध्यक्ष चेतन भाऊ गांगुर्डे, महिला जिल्हा अध्यक्ष उर्मिलाताई गायकवाड नाशिक जिल्हा प्रवक्ते बाळासाहेब शिंदे,भगूर नगरपरिषद नगरसेवक अजय वाहने यांनी केले यावप्रसंगी उपजिल्हाध्यक्ष नानाजी पवार, ,नाशिक जिल्हा महासचिव विश्वनाथ भालेराव, महानगर महासचिव अमोल चंद्र मोरे, महानगर महासचिव हर्षल जाधव पंडित नेटावणे जिल्हा संघटक दीपक भंडारी रामभाऊ निकम गोकुळ लोखंडे श्याम पवार अशोक आगळकर, संजय पांडे आदी उपस्थित होते.

# नागरिकांसाठी पंचायत समिती मध्ये पाण्याची व्यवस्था त्वरित सुरु करा; बहुजन मुक्ती पार्टीची मागणी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे :** दारव्हा पंचायत समिती दारव्हा येथे सर्व सामान्य नागरिकांकारिता शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची जी. पं. यवतमाळ अंतर्गत तेरा लाख तीस हजार रुपये खर्च करून उभी केलेली व्यवस्था धूळ खात असून त्याचा सामान्य नागरिकांना उपयोग तरी काय? हा प्रश्न निर्माण होतो.ह्या फसव्या योजना कुणाच्या ठेकेदारांच्या फायद्यासाठी निर्माण केल्या जात आहे.? कारण ज्या नागरिकांच्या नावाने योजना पंचायत समितीच्या परिसरात ती राबविली जात आहे.ते काम पूर्ण झाल्याचा दि. 9/10/2025 रोजी चे फलक लावलेले असतांना ते बंद का?सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु असून फेब्रुवारी आणि मार्च सुद्धा संपला आहे.आज शुद्ध



आणि थंड पाण्याची गरज प्रत्येक पंचायत समिती परिसरात येणाऱ्या नागरिकांना आवश्यक आहे. असे असतांना सुद्धा उन्हाळ्याचे दोन महिने निघून गेल्यावरही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था येथे दिसून येत नसल्यामुळे आपण काय पावसाळ्यात थंड पाण्याची व्यवस्था नागरिकांसाठी करणार आहात काय? असा प्रश्न पंचायत समिती मध्ये येणाऱ्या नागरिकांना पडला आहे.जर ती पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नागरिकांच्या कामी पडत नसेल तर ती राबविने गरजेचे होते काय? अनेक नागरिक रोज घरकुलाचे पैसे आले का? व ईतर कामासाठी सुद्धा आपल्या कार्यालयात उंबरटे झीजवीत असतात.त्यामुळे किमान त्यांना नाही काही तर शुद्ध पिण्याचे पाणी देणे हे आपले कर्तव्य नसून आद्य कर्तव्य आहे.तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ज्या ठिकाणी परिसरात केली आहे त्यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांचेही फोटो त्यावर लावलेले दिसून येत आहे. व्यवस्था असूनही अव्यवस्था दिसत असल्यामुळे हा त्यांचा अपमान नाही का? त्यामुळे दारव्हा पंचायत समिती परिसरातील शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नागरिकांसाठी त्वरित सुरु करण्यात यावी.अन्यथा दारव्हा तालुक्यातील नागरिकांसह बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल.अशा आशयाचे निवेदन बिमोद विठ्ठलराव मुधाने बहुजन मुक्ती पार्टी लोकसभा अध्यक्ष यवतमाळ /वाशीम यांच्या नेतृत्वात विस्तार अधिकारी यांच्या मार्फत गटविकास अधिकारी पंचायत समिती दारव्हा यांना देण्यात आले.तर यावेळी घनश्याम चव्हाण, गजानन चव्हाण,राजू पेटकर, निलेश राठोड, गणेश राठोड, जे.एन.कांबळे, सौरव चव्हाण, प्रशांत ठाणे, दशरथ शेंदूरकर, योगेश भभूतकर, सदानंद खिल्लारे, ज्ञानेश्वर मेश्राम, शंकर धवणे, पी. एस. बरडे, रविंद्र गजभिये, संतोष इंगोले, नामदेव घोडाम, अशोक मुजमुले, पी.व्ही. निचळे,राहुल मुधाने, अजाबराव ढवळे, अमोल रुणवाल, एकनाथ तायडे, अरुण सोनोने, अंकुश उजवणे, ओम कटके अशा अनेकजणांच्या सह्यानिशी निवेदन देण्यात आले..

# बामसेफ, भारत मुक्ती मोर्चाची विभागीय आढावा बैठक संपन्न

महाराष्ट्र जीत

भारत मुक्ती मोर्चा आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग ( OBC ) मोर्चा च्या संयुक्त विद्यमाने दि. २३ एप्रिल २०२६ ला भारत बंद ची घोषणा केली आहे. भारतातील इतर मागासवर्गीय (OBC ) यांची यांची जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, UGC ऍक्ट लागू व्हायला पाहिजेत, शिक्षण क्षेत्रात शिक्षकांना पात्रता सिद्ध करण्यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा ( TET ) आवश्यक करून त्यांना त्यांच्या रोजी -रोटी पासून दूर करणे त्यामुळे TET परीक्षा रद्द करावी, वाढती महागाई, शेतकरी - शेतमजूर आणि विदयार्थ्यांच्या समस्या हया सर्व बाबी घेऊन मा. वामन मेश्राम ( राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा, नई दिल्ली ) तसेच मा. चौधरी विकास पटेल ( राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय पिछडा वर्ग ( ओ. बी. सी ) मोर्चा यांनी भारत बंद चे आवाहन केले आहे. सर्व सामान्य लोकांना न्याय देण्यासाठी, आणि भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी मोठ्या संख्येने भारत देशातील जनता या भारत बंद मध्ये सहभागी होईल. बामसेफ आणि भारत मुक्ती मोर्चा यांचे गाव



- बूथ स्तरापर्यंतचे संघटन २०२९ पर्यंत निर्माण करून जणआंदोलनास तयार करायचे आहे.या मिटिंगच्या अध्यक्षस्थानी मा. संतोष सुरवाडे सर ( राज्य महासचिव, प्रशिक्षण, बामसेफ, म. राज्य ) हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. डॉ. पंचशीला मोहोड मॅडम यांनी केले. तर कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक मा. भागवत जाधव साहेब ( विभागीय अध्यक्ष, भारत मुक्ती मोर्चा अमरावती विभाग ) हे होते. कार्यक्रमाचे संचालन मा. कौतिककर साहेब ( राज्य सदस्य, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, म. राज्य ) तर आभार मा. बाबा मोहोड ( राष्ट्रीय किसान मोर्चा, म. राज्य ) यांनी केले तर. या मीटिंगला अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, पुसद, बुलढाणा इत्यादी जिल्हामधून ३५ पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# बदलापूर: शिवसेना प्रवक्ते सुदाम घुगे यांना जीवे मारण्याची धमकी

### माजी नगरसेवक नरहरी पाटील यांच्यासह चौघांवर गुन्हा दाखल

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)बदलापूर:** शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बदलापूर येथील कात्रप तलावाच्या सुरक्षेबाबत मागणी करणाऱ्या शिवसेना प्रवक्त्याला चक्क जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बदलापूर पोलीस ठाण्यात माजी नगरसेवक नरहरी पाटील आणि त्यांच्या इतर तीन सहकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी बदलापूर येथील कात्रप तलाव परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. या पार्श्वभूमीवर शिवसेना बदलापूर शहर प्रवक्ते सुदाम घुगे यांनी बदलापूर नगरपालिकेकडे एक मागणी केली होती. तलाव परिसरात बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित सुरू करावेत आणि तिथे सुरक्षेसाठी सिक्युरिटी गार्ड तैनात करावेत, असे त्यांनी प्रशासनाला सुचवले होते.

सुदाम घुगे यांनी केलेली ही मागणी विद्यमान नगरसेवकाचे वडील नरहरी कृष्णा पाटील यांना रुचली नाही. याचाच राग मनात धरून २ एप्रिल २०२६ रोजी नरहरी पाटील, त्यांचे बंधू शरद कृष्णा पाटील, मयूर नरहरी पाटील आणि जगदीश बाळाराम पाटील यांनी सुदाम घुगे यांना गाठले. यावेळी त्यांच्यात शाब्दिक चकमक झाली आणि आरोपींनी घुगे यांना जीवे मारण्याची धमकी देऊन धक्का-बुक्की केली.

या घटनेनंतर सुदाम घुगे यांनी तातडीने बदलापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी नरहरी पाटील, शरद पाटील, मयूर पाटील आणि जगदीश पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सुदाम घुगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आरोपी हे राजकीय वजन असलेले व्यक्ती असून त्यांच्याकडून माझ्या जीवितास मोठा धोका आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी आता शिवसेनेसह स्थानिक नागरिकांकडून होत आहे. बदलापूर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, या घटनेमुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# १२ एप्रिल रोजी वाशीम येथे आंबेडकरी साहित्य संमेलन आयोजित

### संमेलनाध्यक्षपदी,ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ.प्रा. अशोक इंगळे तर उद्घाटन ज्येष्ठ कवी,लोकनाथ यशवंत यांच्या हस्ते



महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर) :** प्रज्ञासूर्य,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पर्वावर, प्रज्ञा साहित्य संघ वाशीम यांच्या वतीने वाशीम येथे आंबेडकरी साहित्य संमेलनाचे जोरदार आयोजन केले आहे. दि,१२ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक शिक्षण महर्षी ॲड, आप्पासाहेब सरनाईक सभागृह, श्री शिवाजी विद्यालय वाशीम येथील येथे म्हणजेच ज्येष्ठ कवी, नामदेव ढसाळ साहित्य नगरी परिसर व ज्येष्ठ कवी, स्मृतीशेष प्रसेनजित ताकसांडे विचारमंच वाशीम या ठिकाणी पार पडणार आहे. साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी अकोला येथील प्रख्यात ज्येष्ठ समीक्षक, ज्येष्ठ कवी, डॉ.अशोक इंगळे तर उद्घाटन नागपूर येथील विसावे विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत राहणार आहेत. या आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी वाशीम येथील, संत चोखामेळा वस्तीगृहाचे संचालक व आदर्श समाजसेवक अनंतकुमार केशवराव जुमडे राहणार आहेत.

साहित्य संमेलनात दिवसभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेशी बांधील असलेले भरगच्च कार्यक्रम राहणार आहेत. सकाळी, डॉ. बाबासाहेबांच्या पुतळयापासून साहित्य संमेलनाच्या स्थळापर्यंत संविधान फेरीने प्रारंभ होणार आहे. उद्घाटकीय समारंभात अनेक मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहेत.उद्घाटन सत्र सकाळी दहा वाजता पासून रात्री समारोप दहा वाजेपर्यंत राहणार आहे. पुस्तक प्रकाशन, पुरस्कार प्रदान, ग्रंथ प्रदर्शन,डॉ.दिपाली गवई यांचा एकपात्री 'रमाई' नाट्य प्रयोग, आंबेडकरी चळवळ आणि कविता, या विषयाच्या अनुषंगाने ज्येष्ठ कवी, शेषराव पिराजी धांडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद. परिसंवादात, महेंद्र ताजणे, प्रशांत वंजारे, डॉ.हेमंतकुमार कांबळे आदी सहभागी होणार आहेत. अमरावती येथील ज्येष्ठ साहित्यिक सुदाम सोनुले यांचे अध्यक्षतेखाली कथाकथन, कथाकथनात,प्रा.संजय घरडे,संजय डोंगरे,धोंडुजा इंगोले, प्रा.सुनिता अवचार,आर.आर.पठाण सहभागी होणार आहेत.नागपूर येथील ज्येष्ठ कवी मच्छिंद्र चोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन.यात महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ कवी सहभागी होणार आहेत. शेवटी समारोप ज्येष्ठ कमी अनिल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून यावेळी प्रमुख उपस्थिती, डॉ. अशोक इंगळे, उद्घाटक, ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत, ज्येष्ठ साहित्यिक, विलास अंभोरे, नागपूर खंडपीठाचे ज्येष्ठ विधीज्ञ, ॲड, डॉ.मोहन गवई आदींची राहणार आहे. हे आंबेडकरी साहित्य संमेलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारसौंदर्य घेऊन चालणारे असल्याने या साहित्य संमेलनातील वैचारिक सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी, सर्व साहित्यप्रेमी आणि आंबेडकरी चळवळीतील भगिनी आणि बंधूंनी अथवा सर्वच माणसांवर प्रेम करणाऱ्या माणूसप्रेमी सन्भगिनी आणि सन्बंधूंनी या आंबेडकरी साहित्य संमेलनाचा आस्वाद आणि सहभाग घेण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आज वाशिम येथे गावा,गावातून महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

### सैनिक शेतकरी विल्फेअर फाउंडेशनच्या वतीने वाशिम येथे महिलांचा भव्य स्वयंरोजगार मेळावा आयोजित

महाराष्ट्र जीत


**वाशिम(प्रतिनिधी) :** स्थानिक येथे आज दिनांक 5 एप्रिल रविवार रोजी सकाळी 11 वाजता वाटाणे लॉन येथे सैनिक शेतकरी वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने महिलांचा स्वयरोजगार भव्य उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मनोज कुमार डांगे हे राहणार आहेत.तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष निलेश निकम महाराष्ट्र राज्य सचिव संजय सतई हे राहणार आहेत.तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाप्रमुख ओमप्रकाश फड,महिला जिल्हाध्यक्ष प्रीतीताई खडसे या राहणार आहेत तर प्रमुख मान्यवरांची उपस्थिती म्हणून तालुका अध्यक्ष गोपाल लव्हाळे,महिला तालुकाध्यक्ष वनमालाताई ढगे, मालेगांव तालुकाध्यक्ष धम्मपाल इंगळे, मालेगांव महिला तालुकाध्यक्ष लता गायकवाड ह्या राहणार आहेत.यावेळी या उद्घाटन सोहळ्या दरम्यान प्रमुख मार्गदर्शक आगामी काळामध्ये सैनिक शेतकरी वेल्फर फाउंडेशनच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तसेच विविध लाभ ग्रामीण भागातील महिला कुटुंबांना देण्यासाठी तसेच महिलांना सर्व रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.म्हणून या ऐतिहासिक अशा भव्य महिला स्वयंरोजगार मेळावा उद्घाटन सोहळयाला जिल्ह्यातील गावागावातील महिलांनी मोठ्या संख्येने संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख सौ छायाताई पवार,किसन काळे,प्रवीण पट्टेबहादूर,स्वातीताई भिमटे जगन कापसे आशाताई देशमुख, नितीन ठाकरे भागीरथीताई कव्हर अमोल गायकवाड, सोनालीताई सरकटे ,अरविंद कांबळे प्रमिलाताई पखाले अभिषेक ढगे, आकांक्षाताई दूधमल,आरती ठोके,पायलताई गायकवाड,सचिन काळमुंदळे, अर्चनाताई टाले अश्विनीताई गायकवाड अतिश ठाकूर प्रशांत पंडित, मंगेश सावळे यांनी केले आहे.

# धानोरा ग्रामपंचायत: 'बंद दरवाजा' कारभारावर संताप!

महाराष्ट्र जीत

**सिंदखेड राजा :प्रतिनिधी :** सिंदखेडराजा तालुक्यातील धानोरा ग्रामपंचायतीत माहितीचा अधिकार कायद्याचा उघडउघड अवमान होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ९ जानेवारी २०२६ रोजी नागरिक समाधान पवार यांनी मागितलेल्या विकास निधीच्या माहितीकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे, तर प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या "१० दिवसांत माहिती द्या" या स्पष्ट आदेशालाही सरळ केराची टोपली दाखवण्यात आली. हा केवळ निष्काळजीपणा नाही — तर लोकशाही प्रक्रियेवरच थेट प्रहार आहे!

याहून गंभीर बाब म्हणजे, माहिती मागे घेण्यासाठी अर्जदाराला वैयक्तिक घरकुल व विहीर मंजुरीचे आमिष दाखवत दबाव टाकल्याचा आरोप समोर आला आहे. त्यामुळे सत्य दडपण्यासाठी सत्तेचा गैरवापर होत असल्याची चर्चा जनतेत रंगली आहे.




१४वा-१५वा वित्त आयोगाचा निधी, विकासकामे, कंत्राटे व ग्रामसभेच्या नोंदींमध्ये मोठ्या गैरव्यवहाराचा संशय व्यक्त होत आहे. जर सर्व काही पारदर्शक असेल, तर माहिती देण्यास भीती का? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात (बीडीओ ) विस्तार अधिकाररी स्तरावरून ग्रामविकास अधिकारी यांना पाठीशी घालण्याचे प्रयत्न होत असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. तक्रारी गांभीर्याने न घेणे, कारवाई टाळणे आणि प्रशासकीय संरक्षण देण्याचा आरोप होत असल्याने संशय अधिक गडद होत आहे.

प्रशासनातीलच काही घटक एकमेकांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत का? हा प्रश्न आता जनतेसमोर उभा ठाकला आहे. कायद्याने दररोज दंडाची तरतूद असतानाही अधिकारी निर्धास्त असल्याने "कोणाचा वरदहस्त?" असा सवाल उपस्थित होत आहे. सामान्य माणसाला नियम दाखवणारी यंत्रणाच नियम मोडत असेल, तर न्याय कुणाकडे मागायचा?

आता प्रकरण राज्य माहिती आयोगाकडे जाणार असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.धानोरा ग्रामपंचायत पारदर्शक होणार की भ्रष्टाचार लपवणार? — संपूर्ण तालुक्याची नजर प्रशासनावर!

# केकतउमरा परिसरात टरबूज कांदा पिकाचे गारपिटीने प्रचंड नुकसान

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याची मागणी





महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** वाशिम जिल्ह्यात दिनांक 4 एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान अचानक वादळी पावसाने तसेच काही भागात गारपिटीने झोडपून काढले. यामध्ये वाशिम येथून जवळच असलेल्या ग्राम केकतउमरा परिसरात झालेल्या अचानक वादळी वाऱ्याने तसेच गारपीटीने शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. यामध्ये कांदा,टरबूज तसेच काही शेतकऱ्यांचे हळद पिकाचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. यामुळे शेतकरी सध्या हवालदिल झालेला आहे. विविध कंपन्यांच्या कांदा लागवड शेतकऱ्यांनी केलेली आहे तसेच टरबूज पिकाचे देखील काही शेतकऱ्यांनी लागवड केलेली आहे. मात्र अचानक आलेल्या गारपीटीमुळे हे सर्व पिके जमीनदोस्त झालेले पहावयास मिळतात. या दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सध्या चिंतेचे वातावरण आहे.या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची शासनामार्फत पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत देणे खऱ्या अर्थाने गरजेचे आहे. या झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पंचनामे करून त्यांना शासन स्तरावरून काही मदत मिळते का ? किंवा शासन त्यांचे पंचनामे करून आर्थिक लाभ देईल का? हे पाहणे महत्त्वाचे आहे.मात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून आता शासनाकडे मदतीची मागणी होत आहे.

# ब्राह्मण सभेच्या वतीने सामूहिक उपनयन संस्कार संपन्न

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड -** मागील गेल्या 45 वर्षापासून परंपरा असलेल्या ब्राह्मण सभेच्या उपनयन संस्कार कार्यक्रम.. अर्थात सामूहिक उपनयन संस्कार.. नुकताच कारंजा ब्राह्मण सभेतर्फे श्री गुरु मंदिर संस्थान येथे संपन्न झाला. कारंजा ब्राह्मण सभा दरवर्षी हा सोहळा आयोजित करण्यात येतो,याही वर्षी शुक्रवार दिनांक 3.4. 2026ला अतिशय उत्साहात हा सोहळा संपन्न झाला. या वर्षी एकंदरीत 19 बटूंचे उपनयन संस्कार पार मध्ये सहभाग नोंदवला.दोन दिवस चालणाऱ्या या सोहळयास कारंजा ब्राह्मण सभा



अध्यक्ष प्रसन्नजी पळसकर तसेच सचिव हेमंत जोशी आणि सर्व कार्यकारणी सदस्य व इतरही समाज बांधव अथक परिश्रम करत असतात. श्री गुरु मंदिर संस्थांन चे अतिशय मोलाचे सहकार्य याही वर्षी संस्थांचे व्यवस्थापक सन्माननीय प्रकाशजी घुडे आणि विश्वस्त निलेश



घुडे यांनी संस्थांतर्फे सर्व बटूंना सोवळे आणि श्रींची प्रतिमा भेटवस्तू म्हणून दिली. संस्थांचे व्यवस्थापक श्री घुडे यांनी बटूंना व सर्व पालकांना उद्बोधन केले सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रसन्नजी पळसकर आणि संचालन सहकोषाध्यक्ष दत्तात्रय दिग्रसकर यांनी तर आभार रोहित महाजन यांनी मानले . श्री गुरु मंदिर संस्थानचे विश्वस्त आणि ब्राह्मण सभा कारंजाचे ब्राम्हणसभा पदाधिकारी मोहनभाऊ तांबोळकर,दत्ताभाऊ देशपांडे,श्रीराम धर्माधिकारी, चारुदत्त दांडवते, राम निंबारमुन्डे,रमेश उफाडे, मोहन देशपांडे,आनंद खेडकर, प्रवीण जोशी, रामगवकर जोशी,संजय कळवे, रामेश्वर हलवणे, श्याम लोखंडे, संतोष किडे, श्याम देशमुख,मिलिंद पाठक, अनंत रहितकर, अभिजित देशपांडे यांना जाते पौरिहत्याची मुख्य जवाबदारी , राजू खेडकर संजय बनसोड, सतीश पाठक तसेच ब्राम्हण सभा गजानन मंदिराचे मुख्य पुजारी प्रकाशराव देशपांडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पडली.

# हायकोर्टाचा महत्वपूर्ण निर्णय : एफआयआर रद्द करण्यास नकार; येडूर (खुर्द) प्रकरणातील आरोपींना दिलासा नाही

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर तालुक्यातील येडूर (खुर्द) येथील शेताकडे जाणाऱ्या महिलेचा रस्ता रोकून विनयभंग केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात फौजदारी प्रकरणात आरोपींना दिलासा देण्यास नकार देत, बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्या विरुद्ध दाखल झालेली प्रथम खबरी अहवाल व चार्जशीट रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला आहे.यातील फिर्यादी महिला हि शेतात जात असताना गावातील तिला अडवले. मुख्य आरोपीने काठीने डोक्यावर मारले, इतरांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपींनी अश्लील शिवीगाळ केली. मुख्य आरोपी बालाजी पिटलेवाड याने तिच्या अंगाला हात लावून लज्जा भंग केला. याप्रकरणी मरखेल पोलिसांत गु.र.नं. ७६/२०२२ भादविच्या कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३५४, २९४, ३२३, ३४१, ५०६ प्रमाणे बालाजी मारोती पिटलेवाड, लक्ष्मीबाई बालाजी पिटलेवाड, मारोती हनमंत पिटलेवाड, सुभाबाई मारोती पिटलेवाड, शीतल बालाजी पिटलेवाड, नितल बालाजी पिटलेवाड व शिवाजी लक्ष्मन धर्मावाड यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर प्रकरणात आरोपींनी न्यायालयात अर्ज दाखल करून, त्यांच्याविरोधातील गुन्हा हा खोटा असून सूडबुद्धीने दाखल करण्यात आला असल्याचा युक्तिवाद केला होता. तसेच एफआयआर दाखल करण्यात चार दिवसांचा उशीर झाल्यामुळे ती संशयास्पद असल्याचेही त्यांनी मांडले. त्यास उत्तर देत असताना मुळ तक्रारदाराच्या वतीने ॲड. उमाकांत देशमुख यांनी फिर्यादीने केलेले आरोप हे ठोस असून प्रत्येक आरोपीची भूमिका एफआयआर मध्ये स्पष्टपणे नमूद आहे असे मांडले. तसेच फिर्यादीच्या जखमांचे वैद्यकीय पुरावे देखील उपलब्ध असल्यामुळे प्राथमिकदृष्ट्या गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाच्या लक्षात आणून दिले. तसेच प्रकरणात आधीच ट्रायल कोर्टाने आरोप निश्चित केले असल्याने, या टप्प्यावर उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद केला. सदर युक्तिवाद मान्य करत मा. न्यायालयाने सर्व बाबीचा विचार करत, "केवळ 'counter blast' च्या आधारे एफआयआर रद्द करता येत नाही," असे ठाम निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने पुढे सांगितले की, एफआयआर दाखल करण्यात झालेला उशीर किंवा इतर बचावाचे मुद्दे हे ट्रायलदरम्यान पुराव्यावर ठरवले जातील आणि या टप्प्यावर त्यावर निर्णय देणे योग्य नाही. आरोपींचा एफआयआर व चार्जशीट रद्द करण्याचा अर्ज फेटाळण्यात आला असून, संबंधित फौजदारी खटला पुढील सुनावणीसाठी कायम ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात मूळ फिर्यादीकडुन उमाकांत देशमुख देगलूरकर यांनी भक्कमपणे बाजू मांडली.

दैनिक महाराष्ट्र जीत
रविवार, ०५ एप्रिल २०२६



# मंगरुळपीर येथे चर्चित ट्रिपल तलाक व हुंडा मानसिक छळ प्रकरणात मुंबई उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठाचा मोठा निर्णय

## एडवोकेट हसीब मिर्ज़ा यांची यशस्वी पैरवी

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अब्दुल जुबेर नागपूर :** वाशिम ज़िल्हयात मंगरुळपीर पोलिस स्टेशन येथे दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय न्याय संहिता आणि मुस्लिम वूमेन प्रोटेक्शन एक्टचे कलमा नुसार नोंद झालेल्या गुन्हा क्र. ५८०/२०२५ मधील एफआयआर व त्यातून उद्भवलेल्या सर्व फौजदारी कार्यवाही मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दि. २५ मार्च २०२६ रोजी रद्द (Quash) केल्या.



या प्रकरणात महिला फिर्यादीने आरोपी - ऐफाज बेग पिता अय्यूब बेग व इतर (एकूण ६ जण, सर्व रहिवासी गरिब नवाज कॉलनी, करंजा लाड, जि. वाशिम) यांच्यावर हुंडा मागणी, मानसिक छळ आणि तिहेरी तलाक देण्याचे गंभीर आरोप केले होते.

पोलिसांनी तपास पूर्ण करून चार्जशीट दाखल केली होती आणि प्रकरण JMFC मंगरुळपीर न्यायालयात आरसीसी क्र. ४९/२०२६ म्हणून प्रलंबित होते.

या प्रकरणात सर्व अर्जदारांच्या वतीने एडवोकेट हसीब मिर्ज़ा यांनी एफआयआर व त्यातून उद्भवलेल्या सर्व फौजदारी कार्यवाही रद्द (Quash) करण्याकरीता मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे क्रिमिनल अर्ज क्र. एपीएल ३२९/२०२६ दाखल करून प्रभावी आणि यशस्वी पैरवी केली.मा. उच्च न्यायालयाने सखोल सुनावणीनंतर नमूद केले की, हे प्रकरण प्रामुख्याने वैवाहिक मतभेदातून उद्भवलेले आहे. उपलब्ध पुरावे आणि कायदेशीर बाबींचा विचार करून न्यायालयाने अर्ज मंजूर करत एफआयआर क्रमांक ५८०/२०२५ व पुढील सर्व फौजदारी कार्यवाही तसेच मंगरुलपीर JMFC मंगरुळपीर न्यायालयात आरसीसी क्र. ४९/२०२६ रद्द करण्याचा महत्वपूर्ण आदेश दिला.या प्रकरणात सर्व अर्जदारांच्या वतीने एडवोकेट हसीब मिर्ज़ा यांनी बाज़ू मांडली

# श्री दत्त शिखर संस्थानचे महंत प. पू. मधुसूदनजी भारती महाराज वैकुंठवासी

महाराष्ट्र जीत





**श्रीक्षेत्र माहूर/सुभाष खडसे :** श्री दत्त शिखर संस्थानचे महंत प. पू. मधुसूदनजी भारती गुरु अच्युत भारती महाराज (95) हे शनिवार, दि. 4 एप्रिल रोजी दु.सुमारे 5:05 वाजण्याच्या सुमारास देवाज्ञा झाली इहलोक सोडून वैकुंठवासी झालेत. त्यांच्या इहलोकी जाण्याने असंख्य भक्तगन शोकसागरात बुडाले आहेत. स्वर्गीय महंत प. पू. अच्युत भारती महाराज हे वैकुंठवासी झाले नंतर प. पू.मधुसूदनजी भारती महाराज हे सन 1978 साली संस्थानच्या धार्मिक प्रक्रियेनुसार गादीवर विराजमान झाले होते.अत्यंत साधेपणा, अध्यात्मिक चिंतन आणि भक्तीभावासाठी ओळखले जात होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात श्री दत्त शिखर संस्थानच्या धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच भक्तांच्या सेवेसाठी स्वतःला अर्पण केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक धार्मिक उपक्रम, पूजा-अर्चा, तसेच उत्सव मोठ्या श्रद्धा आणि शिस्तीत पार पडत होते.

महाराजांच्या प्रवचनांमधून त्यांनी अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि संस्कार यांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचवला. त्यांच्या साध्या जीवनशैलीमुळे आणि प्रेमळ स्वभावामुळे ते सर्वांच्या मनात विशेष स्थान निर्माण करू शकले होते.त्यांच्या निधनाची बातमी समजताच माहूर व परिसरातील भाविकांनी दत्त शिखराकडे धाव घेत अंतिम दर्शनासाठी मोठी गर्दी केली. अनेक संत, महंत, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

दरम्यान, त्यांच्या पार्थिवावर उध्या दुपारी 3:00धार्मिक विधीनुसार अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, संस्थानतर्फे पुढील कार्यक्रमांची माहिती लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.प. पू. मधुसूदनजी भारती महाराज यांच्या जाण्याने अध्यात्मिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या स्मृती आणि कार्य भाविकांच्या मनात कायम राहणार आहेत.

# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, NIRF १०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो.

या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय.

याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात.

यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो.

याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

**शिक्षण, समानता आणि संविधानिक मूल्यांवरील परिणाम :-**

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशाच्या परिणामांचा विचार केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही; कारण या निर्णयाचा सर्वात थेट आणि दीर्घकालीन परिणाम शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेवर, शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजातील समतेच्या संकल्पनेवर होणार आहे. या आदेशानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा आधार घेतला जात असल्यामुळे, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेतच असमानतेची बीजे पेरली जात आहेत.

शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल.

या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे.

संविधानाच्या दृष्टीने पाहिले असता, भारतातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना पुढे आणण्यासाठी अनेक विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु या शासन आदेशामुळे या घटकांना प्रत्यक्षात स्पर्धेबाहेर ढकलले जात आहे. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते; परंतु जर शिक्षणाच्या संधीच मर्यादित केल्या गेल्या, तर सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरेल.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात. परंतु त्यांच्या विद्यापीठांचा क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी लेखले जाते. यामुळे या विद्यापीठांची प्रतिष्ठा कमी होते आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.

याचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे गुणवत्तावान विद्यार्थी आणि शिक्षक किंवा प्राध्यापक हे मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, स्थानिक विद्यापीठे कमकुवत होतात. त्यांच्याकडे संसाधनांची कमतरता निर्माण होते आणि त्यांच्या विकासावर परिणाम होतो. ही प्रक्रिया पुढे जाऊन शिक्षणातील प्रादेशिक विषमता अधिक वाढवते. एकीकडे पुणे आणि मुंबईसारखी पिद्यापीठे, शहरे अधिक मजबूत होतात, तर दुसरीकडे इतर भाग मागे पडतात.

या धोरणाचा मानसिक परिणामही अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या शिक्षण संस्थेबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढवणारी प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः आदिवासी, दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो, कारण ते आधीच सामाजिक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असतात.

याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये "गुणवत्ता" या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावला जातो. गुणवत्ता म्हणजे केवळ संस्थेचा क्रमांक नव्हे, तर विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांचे कौशल्य, त्यांची विचारशक्ती आणि त्यांच्या अध्यापन क्षमतेचा एकत्रित परिणाम असतो. परंतु सध्याच्या धोरणामुळे गुणवत्ता ही केवळ क्रमांकापुरती मर्यादित केली जात आहे. हा दृष्टिकोन शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांनाच विरोध करणारा आहे.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात ही समस्या अधिक गंभीर होते. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वातच नव्हती. त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी कोणतेही निर्णय घेताना या क्रमवारीचा विचार केलेला नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. हा निर्णय केवळ तांत्रिकदृष्ट्या चुकीचा नाही, तर नैतिकदृष्ट्याही अयोग्य आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, हा शासन आदेश शिक्षणातील विषमता वाढविणारा, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा आणणारा आणि राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन करणारा ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात कोणतेही धोरण राबविताना त्याचा सर्व घटकांवर होणारा परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे.

**पर्याय, उपाय आणि समतोल शिक्षणव्यवस्थेची गरज :-**

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता, केवळ टीका करून थांबणे पुरेसे नाही; तर त्यासाठी योग्य पर्याय आणि रचनात्मक उपाय सुचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे या क्षेत्रात घेतलेले कोणतेही धोरणात्मक निर्णय हे सर्वसमावेशक, न्याय्य आणि वास्तववादी असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या शासन आदेशामध्ये गुणवत्ता या संकल्पनेचा जो अरुंद अर्थ लावण्यात आला आहे, तो बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

सर्वप्रथम, उमेदवारांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकावर आधारित निकष लावण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर आधारित मूल्यांकन प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन क्षमता आणि सामाजिक बांधिलकी या घटकांचा विचार करून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. केवळ संस्थेच्या क्रमांकावर आधारित मूल्यांकन केल्यास अनेक गुणवत्तावान उमेदवार संधीपासून वंचित राहतात.

दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांना समान संधी उपलब्ध करून देणे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठ हे त्या त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक निधी, संशोधन सुविधा, पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक किंवा प्राध्यापक उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर सर्व विद्यापीठांची गुणवत्ता सुधारली, तर विद्यार्थ्यांना केवळ काही मोजक्या विद्यापीठांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

तिसरे म्हणजे, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून दिली गेली, तर काही प्रमाणात विषमता कमी होऊ शकते. परंतु दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातही शासनाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. QS, THE आणि ARWU सारख्या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे हे सर्वांसाठी शक्य नाही. त्यामुळे या निकषाचा वापर केवळ अतिरिक्त गुणवत्तेचा घटक म्हणून करावा, तो अनिवार्य निकष म्हणून लावू नये. अन्यथा हा निकष केवळ सधन वर्गासाठीच फायदेशीर ठरेल.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे अन्यायकारक आहे. अशा उमेदवारांसाठी त्यांच्या अनुभव, कार्यक्षमता आणि इतर गुणांवर आधारित मूल्यांकन प्रणाली तयार केली पाहिजे.

याचबरोबर, शिक्षण क्षेत्रात "गुणवत्ता" या संकल्पनेचा व्यापक अर्थ स्वीकारणे गरजेचे आहे. गुणवत्ता म्हणजे केवळ उच्च क्रमांकाच्या संस्थेत शिक्षण घेणे नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम महत्त्वाचा असतो. अनेकदा ग्रामीण भागातील विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजात अधिक प्रभावी कामगिरी करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान करणे आवश्यक आहे.

शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करताना सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील कोणतेही धोरण हे केवळ काही मोजक्या लोकांसाठी नव्हे, तर सर्व घटकांसाठी फायदेशीर असावे. अन्यथा अशा धोरणांमुळे समाजात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते.

या संदर्भात, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि न्याय्यता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना त्यांच्या वास्तविक गुणवत्तेचा विचार केला गेला पाहिजे. तसेच, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील उमेदवारांना समान संधी मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात विविधता टिकून राहील आणि विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन मिळेल.शेवटी, शिक्षण हे समाजातील विषमता कमी करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. परंतु जर शिक्षण व्यवस्थेमध्येच विषमता निर्माण केली गेली, तर समाजातील दरी अधिक वाढेल. त्यामुळे आज गरज आहे ती समतोल, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण धोरणाची. शासनाने घेतलेले निर्णय हे दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊनच घ्यावेत.११ फेब्रुवारी २०२६ चा शासन आदेश हा गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेला असला, तरी त्याचे परिणाम विचारात घेतले असता तो सामाजिक विषमता वाढविणारा ठरतो. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा "गुणवत्ता" या नावाखाली आपण नकळतपणे समाजात असमानता वाढवत आहोत, आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी योग्य नाही.

**डॉ. राजेंद्र बगाटे, एम.ए, नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. पोस्ट-डॉक्टरेट (पीडीएफ), (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**